दुष्काळी परिस्थितीत गाळपेरा क्षेत्र फक्त चारा लागवडीकरीता शेतकरी/पशुपालकांना उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४६७ (ई-1895255) /सिं.व्य. (महसूल)

नवीन प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०२ नोव्हेंबर, २०२६

वाचाः- १. कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. डीएएचडी- १४०१२/५/२०२३-डीएएचडी-एएच-४ (६७०१३०), दि. २१.०९.२०२३

२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५.०९.२०२६

३. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दि. १४.१०.२०२६

४. जलसंपदा विभाग, शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४६७/सिं.व्य.(म.)-भाग(१), दि. २१.१०.२०२६

५. जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/(प्र.क्र.५०/२०२६)/सिं.व्य.(धो.), दि. ०५.१०.२०२६

प्रस्तावना :-

अल-निनोच्या प्रभावामुळे राज्यातील तालुक्यांमध्ये पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यातील Trigger-१ (प्रथम कळ) आणि Trigger-२ (दुसरी कळ) अंतर्गत उपरोक्त संदर्भ क्र. २ व ३ येथील नमूद शासन निर्णयान्वये एकूण ३०५ तालुके हे दुष्काळी तालुके म्हणून जाहीर करण्यात आले आहेत. राज्यातील सदर ३०५ तालुक्यांना राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये जनावरांना चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करण्याची बाब देखील नमूद करण्यात आली आहे.

राज्यातील प्रमुख धरणे, जलाशये, तलाव व इतर जलस्त्रोतांमध्ये असलेला जलसाठा मर्यादित असल्याने त्याचा विविध उपयोगांसाठी काळजीपूर्वक व विशिष्ट प्राधान्यक्रमाने वापर करणे आवश्यक असल्याने उपलब्ध जलसाठ्याच्या व्यवस्थापनाबाबत उपरोक्त संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील नमूद शासन निर्णयानुसार, दुष्काळी परिस्थितीत जलसंपदा आणि मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलाशयातील गाळपेऱ्याची

जमीन प्राधान्याने चारा पिकांच्या लागवडीखाली आणण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. ४ येथील शासनपत्रान्वये जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील सर्व महामंडळांना पशुसंवर्धन विभागास आवश्यक ते सहकार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुष्काळ निवारणार्थ स्थापित मा. मंत्रिमंडळ उपसमितीने दि. २७.१०.२०२६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार, जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील जलाशयांमधील उपलब्ध गाळपेरा जमिनीचा विनियोग केवळ चारा पिकांच्या लागवडीकरीता शेतकरी/पशुपालकांना उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जलसंपदा विभागाच्या जलाशयातील जलसंचय बाष्पीभवनामुळे कमी झाल्याने, बुडीत क्षेत्रातील जमिनी मोकळ्या/उघड्या होणार आहेत. या जमिनींमधील ओलावा आणि अत्यावश्यक परिस्थितीत जलाशयाद्वारे उपलब्ध होणारी सिंचनव्यवस्था विचारात घेऊन अशा जमिनीवर मोठ्या प्रमाणात चारा पिकांची पेरणी करून चाऱ्याचे उत्पादन घेणे शक्य आहे. यास्तव जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मोठे प्रकल्प / मध्यम प्रकल्प / लघु प्रकल्पांच्या जलाशयातील गाळपेऱ्याची जमीन फक्त चारा पिकांच्या लागवडीखाली आणण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, १९७८ मधील परिशिष्ट १७ अन्वये गाळपेऱ्या जमिनीचे वाटप कार्यपद्धतीचे अवलंबन करून सदर जमीन केवळ चारा पिकांसाठी शेतकरी/पशुपालकांना वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. गाळपेरा जमिनीवर चारा उत्पादन घेऊन चारा टंचाई निवारणाकरिता लाभार्थी निवड, समन्वय व संनियंत्रणासाठी पशुसंवर्धन विभागाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत केली आहे. त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

अ.क्र.	पदनाम	समितीतील स्थान
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी	सदस्य
३	अधीक्षक अभियंता (सिंचन)	सदस्य
४	कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण	सदस्य
५	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी	सदस्य
६	जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त	सदस्य सचिव

सदर शासन निर्णय पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी ई नस्तीवरील दि. ०२.११.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०२१७२८१३२८२७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAVITA CHANDRASHEKHAR BODHEKAR

Digitally signed by SAVITA CHANDRASHEKHAR BODHEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=c8ca43b8af581a3826084d1463fa7e004e47a9457ec0be246ec1b6e31297909a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2E11F2710D714EA0D63E58112977EFBE2A7E923B4738CFD1CF42068F361E0575, cn=SAVITA CHANDRASHEKHAR BODHEKAR
Date: 2026.11.02 17:29:35 +05'30'

(सविता बोधेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
८) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी).
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) सर्व जिल्हाधिकारी.
१४) सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग.
१५) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१८) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
१९) सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
२०) सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
२१) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२२) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग / मृद व जलसंधारण विभाग.
२३) निवडनस्ती- सिं.व्य (महसूल).